# विद्युत खांब गंजल्याने नागरिकात भीती

**इगतपुरी दि. २५ प्रतिनिधी**



इगतपुरी शहरातील जुन्या राष्ट्रीय महामार्ग, लोया रोड तसेच मुख्य बाजारपेठेमधील विद्युत पुरवठा करणारे अनेक खांब ( विद्युत पोल ) सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत. या पोलांचे लोखंडी भाग गंजलेले असून, काही पोल पूर्णपणे सडून गेले आहेत. काही विद्युत पोलच्या खांबाल्या जाळ्या झालेल्या असून कोणत्याही क्षणी हे पोल कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. या मार्गांवर दररोज हजारो नागरिकांचा वावर असतो. याशिवाय पावसाळ्याच्या तोंडावर विद्युत वाहिन्यांचे काम सुरू असल्यामुळे महावितरणचे कर्मचारी देखील या पोलांवर चढून काम करत आहेत. मात्र, कर्मचाऱ्यांकडे ना योग्य सेफ्टी किट आहेत, ना आवश्यक साधनसामग्री त्यामुळे हे काम अक्षरशः जीव धोक्यात घालून केले जात रामभरोसे काम असल्याचे विदारक चित्र समोर येत आहे.

या संदर्भात महावितरण विभागाने तात्काळ दखल घेऊन सडलेले विद्युत खांब बदलणे, कर्मचाऱ्यांना सुरक्षा उपकरणे उपलब्ध करून देणे आणि कामाची योग्य देखरेख करणे आवश्यक आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यास प्रशासन जबाबदार ठरेल, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत असुन शहरातील सर्व धोकादायक पोल तात्काळ बदलावेत आणि कर्मचार्यांच्या सुरक्षेची हमी द्यावी अशी मागणी शिवसेना शहराध्यक्ष भूषण जाधव यांनी केली आहे. यावेळी माहिती देताना शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हा प्रमुख मोहन बऱ्हे, शहराध्यक्ष भूषण जाधव, अलीम गलेरिया, प्रथमेश गोडे, अनुज लोया, योगेश भडांगे आदी उपस्थित होते.

## यशराज अहिरेचा वर्धमान संस्थेत गौरव



**मालेगाव ।** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत येथील वर्धमान शिक्षण संस्था संचलित रतिलाल वीरचंद शाह विद्यालयाच्या यशराज बद्रीनाथ अहिरे या विद्यार्थ्याने ९८.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात व मालेगाव तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावल्याने त्याचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात येऊन रोख पारितोषिक देण्यात आले. विद्यालयात संस्थेचे उपाध्यक्ष परेश शाह, सचिव प्रताप शाह, सहसचिव गौतम प्रकाश शाह, गौतम रमेशचंद्र शाह, प्राचार्य मंगेश सूर्यवंशी, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख मिलिंद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला. यावेळी विविध बक्षीस योजनेंतर्गत यशराजला रोख स्वरूपाचे पारितोषिक प्रदान केले गेले. यावेळी बोलताना सचिव शाह व प्राचार्य सूर्यवंशी यांनी यशराजचे कौतुक व अभिनंदन केले. त्याचे यश अन्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी यशराजने मनोगत व्यक्त करतांना संस्था व शिक्षकांच्या मार्गदर्शन पाठबळामुळे यश मिळाल्याचे सांगत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. आभार प्रदर्शन एन. के.गायकवाड यांनी केले.

# नाफेड-एनसीसीएफची कांदा खरेदी कधी?

**लासलगाव दि.२५हारून शेख**



मागील वर्षी फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या मार्फत कांदा खरेदीच्या घोळ बाबत कांदा उत्पादकांची तीव्र नाराजी बघता केंद्र सरकारने यंदा नाफेड आणि नॅशनल को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर्स फेडरेशन (एनसीसीएफ) या संस्थांकडून कांदा खरेदी केली जाणार असल्याची घोषणा करून तीन आठवडे उलटले यावर्षीही ३ लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, एप्रिलच्या अखेरीस निविदा प्रक्रिया पार पडली आहे. मात्र, मे महिना संपत आला तरी अद्याप प्रत्यक्ष खरेदी सुरू झाली नसल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी संभ्रमात असून, खरेदीच्या प्रतीक्षेत डोळे लावून बसले आहे.

दोन आठवड्यापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड हेक्टर क्षेत्रातील उन्हाळ कांदा पीक बाधित झाले तर रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी उन्हाळी मका, बाजरी, कांदा, कलिंगड, या पिकांची लागवड केली होती मार्च पासूनच तापमानात वाढ झाल्याने मका कलिंगड कांदा गहू आदि पिकांना फटका बसून उत्पादनात घट झाली त्यातभर उन्हाळी मका,बाजरी, टोमॅटो कलिंगड, भुईमूग,भाजीपाला,आदि उभ्या आणि काढणी करून ठेवलेल्या पिकांबरोबर आंबा,पेरू, चिकू आणि द्राक्ष या फळबागाचे अवकाळी व मान्सूनपूर्व वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले. सध्या कांद्याला मिळणारे दर आणि झालेला खर्च बघता ताळमेळ बसत नसल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

यंदा एकटच्या नाशिक जिल्ह्यातून नाफेड आणि एनसीसीएफकडून ३ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचे उद्दिष्ट आहे.एनसीसीएफने या खरेदीसाठी टप्प्याटप्प्याने योजना आखली होती मात्र, निविदा प्रक्रिया पार पडून तीन आठवड्यांहून अधिक काळ उलटूनही प्रत्यक्ष खरेदीला सुरुवात झालेली नाही. मागील वर्षी कांदा खरेदी प्रक्रियेमध्ये अनेक तक्रारी व अनियमितता समोर आल्याने यंदा कारभार अधिक पारदर्शक आणि वेळेवर होईल, अशी अपेक्षा आणि प्रतिक्षा उत्पादक शेतकरी करीत आहेत.

दरम्यान, बाजार समितीत कांद्याला समाधानकारक दर मिळत नसून, अवकाळी पावसामुळे आणि ढगाळ हवामानामुळे कांद्याचे नुकसान होत आहे. चांगल्या प्रतीच्या कांद्याची साठवणूक योग्य वेळी न झाल्यास कांदा खराब होण्याचा धोका वाढत आहे.त्यामुळे नाफेड एनसीसीएफची कांदा खरेदी लवकर सुरू करण्याची जोरदार मागणी शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत दि.१९ ते २४ मे या एक सप्ताहात उन्हाळ कांद्याची ४०८ वाहनांमधून ८५ हजार ३०२ क्विंटल आवक झाली. किमान ५०० कमाल १६०० तर सरासरी ११५० रुपये प्रती क्विंटल दर मिळाला. गेल्या सप्ताहात ९८ हजार ६७६ क्विंटल कांद्याची आवक झाली होती या आठवड्यात अवकाळी पावसामुळे कांद्याची आवक १३ हजार क्विंटलने घटलेली दिसून आली. एप्रिलमध्ये निविदा प्रक्रिया होऊन ही मे महिना संपत आला तरी खरेदी सुरु झालेली नाही, हे प्रशासनाचं अपयशच म्हणावे लागेल. कांदा उत्पादक शेतकरी खरेदीकडे अपेक्षेने नजर लाऊन बसले -हि परिस्थिती दुर्दैवी!

**भारत दिघोळे,** अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटना

# येवल्यात स्वामी समर्थ पालखी दाखल

**येवला । प्रतिनिधी**

अक्कलकोटच्या अन्नछत्र मंडळाची स्वामी समर्थांची पालखी तब्बल आठ हजार कि.मी.चा प्रवास करून शनिवारी, सकाळी अकरा वाजता येवल्यात दाखल झाली.

विंचूर चौफुली येथे पालखीचे सेवेकरी व भाविकांनी फुलांचा वर्षाव करत स्वागत केले. त्यानंतर वाजत गाजत मेनरोडने पालखी कालिका माता मंदिराकडे निघाली. यावेळी महिला वर्गाने पालखी मार्गावर सडा रांगोळी काढली होती. ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करत पालखीचे स्वागत, पूजा तसेच दर्शन केल्या गेले. श्री दत्त प्रभू व स्वामी समर्थ यांचा जयघोष करत पालखी कालिकामाता मंदिरात दाखल झाली. यावेळी महाआरती व महाप्रसाद कार्यक्रम झाला. दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

शहरात स्वामी समर्थांची पालखी येण्याचे हे १९ वे वर्ष आहे अक्कलकोट अन्न छत्र मंडळ संस्थानातील ३५सेवेकरी पालखी सोबत असतात. दुपारी ४.३० वाजता पालखी पोहेगाव कोपरगाव येथे मुक्कामी गेली.



### दरवर्षी परिक्रमा उपक्रम

गेल्या २७ वर्षापासून हा उपक्रम नियमित सुरू आहे अक्कलकोट येथे स्वामींच्या दर्शनासाठी लाखो भाविक येत असतात. या भाविकांना अन्नक्षेत्रालयात महाप्रसादाचे मोफत वाटप करण्यात येत आहे सध्याचे अन्न छात्रालय कमी पडत असून मदतीची गरज आहे. अनेक भाविक स्वामींच्या दर्शनासाठी अक्कलकोट येथे जाऊ शकत नाहीत अशा गरीब व आबाल वृद्ध आणि महिला यांना स्वामींच्या पादुकांचे दर्शन आपल्या घराजवळ घेता यावे, या दोन कारणांसाठी वर्षातून एकदा पालखी काढण्यात येते व यातून जमा होणारी रक्कम नवीन बांधण्यात येणाऱ्या अन्नछत्रालय यासाठी वापरण्यात येणार आहे.

**– संजय कुलकर्णी,** पुरोहित स्वामी समर्थ संस्थान अक्कलकोट

श्रीरामपूर, हिंगणघाट, वाशिम, परभणी, परळी वैजनाथ, माजलगाव, शेवगाव, अहिल्यानगर, मोहोळ, लातूर मार्गे तुळजापूर व २५ जून २०२५ रोजी सोलापूर व २६ जून २०२५ रोजी अक्कलकोट मुक्कामी असा साधारण सहा महिने १८ दिवसात १० हजार ५०० किमी चालून परिक्रमा पूर्ण केली जाते.


* **नाशिक –** आज दिवसभर ढगाळ वातावरण असल्याने पावसाळ्याची चर्चा नागरिकांत होती. जिल्ह्याच्या काही भागात पाऊस झाल्याने मान्सूनचे आगमन झाल्याचे स्पष्ट होते. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकरी, नागरिक, ग्रामस्थ यांची धावपळ उडाली. पावसामुळे वाहतूक खोळंबा झाल्याचे चित्रही सिन्नर तालुक्यात पहायला मिळत होते.

## वृद्धा दाम्पत्याला लुटण्याचा प्रयत्न

**येवला ।** शहरात वृद्ध दाम्पत्याला लुटण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. साहेबराव चव्हाण (वय ७४) रा. रायते ता. येवला हे आपल्या पत्नीसोबत येवला शहरात कामानिमित्त आले होते. घरी परतत असताना दोन मोटर सायकल वर आलेल्या चौघा अज्ञात चोरट्याने पोलीस असल्याची बतावणी करत या वृद्ध दांपत्याला सोने काढून पिशवीत ठेवण्याची बतावणी केली. मात्र चव्हाण यांना संशय आल्याने त्यांनी सोने पिशवीत ठेवण्यास नकार दिला. यावेळी चोरट्यानी झटापट करून सोनं लुटण्याचा प्रयत्न केला परंतु चव्हाण यांनी प्रतिकार करत आरडा ओरड केल्याने चोरट्यांनी पळ काढला. सदर घटना शनिवारी, (दि. २४) दुपारी पाच वाजेच्या सुमारास विंचूर रोडवर महात्मा फुले नाट्यगृहासमोर घडली. दरम्यान, चव्हाण यांनी तत्काळ शहर पोलिसांशी संपर्क केला.

## साधुंचे कुशावर्तात शाहीस्नान करणार : रमेशगिरी

**त्र्यंबकेश्वर दि.२५ प्रतिनिधी**



येथील कुशावर्त कुंडामध्येच अमृताचे थेंब पडलेले असल्याने कुशावर्त कुंडामध्येच शाहीस्नान करण्याची परंपरा साधू राखणार आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यात कुशावर्त कुंडामध्येच शैव साधू-महंत शाहीस्नान करणार असल्याचे प्रतिपादन श्री पंचायती महानिर्वाणी सचिव श्रीमंहत रमेशगिरी महाराज यांनी केले आहे. यावेळी ठाणापती महंत अजयपुरी हे उपस्थित होते. त्र्यंबकेश्वर येथे महानिर्वाणी आखाड्यात पत्रकार परिषदेते बोलत होते.

यावेळी रमेशगिरी महाराज म्हणाले की, त्र्यंबकेश्वर येथे मागे झालेल्या बैठकीत एका महापुरुषांने कुशावर्त कुंडामध्ये शाहीस्नान न करता गोदावरी घाटांमध्ये स्नान करण्याची घोषणा केली परंतु ती घोषणा आधारहीन आहे.तसेच खोट्या लेटरपेडाचा आधार घेऊन शासन प्रशासना सोबत विचार विनिमय करण्यात आला ते ही आधारहीन असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

पूर्वी त्र्यंबकेश्वर येथे कुशावर्त कुंडामध्ये च १३ आखाडे कुंभमेळ्यात शाहीस्नान करायचे परंतु काही कारणास्तव ३ बैरागी आखाडे हे नासिक पंचवटी येथे शाहीस्नान करतात तर १० शैव आखाडे त्र्यंबकेश्वर कुशावर्त कुंडामध्ये शाही स्नान करतात त्यामुळे कुशावर्त कुंडामध्येच शाही स्नान करण्याची परंपरा असून त्या ठिकाणीच साधू-महंत शाहीस्नान करतील. त्यामुळे शासन व प्रशासनाने कुशावर्त येथेच सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्यावे. तसेच कुशावर्त कुंडाशेजारी असलेले शौचालय तात्काळ हटवण्यात यावे तसेच कुशावर्त कुंडापासून गोदावरी नदी वाहती राहिली असे नियोजन करावे.

त्र्यंबकेश्वर येथील आखाडा परिषदेचे अध्यक्ष श्रीमहंत सागरनंद सरस्वती हे ब्रह्मलीन झालेले असल्याने त्र्यंबकेश्वर येथील स्थानिक आखाडा परिषद अस्तित्वात नाही. त्यामुळे शासन -प्रशासनाने होणाऱ्या मिटींगसाठी प्रत्येक आखाडयाचे दोन दोन प्रतिनिधींना बोलवावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्याचे प्रमुख आहेत. त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्याचे महत्व लक्षात घेता मुख्यमंत्री यांनी त्र्यंबकेश्वर येथे स्वतंत्र बैठकीचे आयोजन करावे. शासन प्रशासनामध्ये उच्चस्तरीय अधिकारी असल्याने कुंभमेळ्यासाठी काय -काय सुविधा लागतात याचे नियोजन त्यांनीच करावे. फक्त साधू महंत आखाडा देवता ,भक्त परिवार यांची परंपरा खंडीत करु नये असे प्रतिपादन श्रीमहंत रमेशगिरी महाराज यांनी केले आहे.

# मोबाईलमुळे मुले एकलकोंडे

**कोहोर दि.२५ किसन ठाकरे**

सध्या दोन वर्षाच्या बालकांपासून ते ज्येष्ठापर्यंत सगळ्यांनाच मोबाईलचा लळा लागला आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे किशोरवयीन मुलांमध्ये एकलकोंडेपणात वाढ होऊन विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तर दिवस-रात्र मोबाईलमध्ये घालविणाऱ्या तरुणांईचे भविष्य संकटात सापडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

गेल्या काही वर्षात संवादाचे माध्यम असलेल्या मोबाईल तंत्रज्ञानात आमुलाग्र बद्दल झाले आहेत. सध्या घरोघरी मोबाईल, टीव्ही, संगणक, लॅपटॉप या दैनंदिन गरजेच्या वस्तू म्हणून वापरल्या जाऊ लागल्या आहेत. तर नवीन पिढी या साधनांची पुरस्कर्ती झाली आहे. सुरुवातीच्या काळात कुतूहल म्हणून मुलांच्या हातात दिलेला मोबाईल त्यांच्या सवयीचा भाग झालेला आहे. त्यामुळे आता डोळ्याच्या आजारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पालकांनी सजग राहणे गरजेचे बनले आहे. 'मोबाइल ' सध्या प्रत्येक घराला लागलेले ग्रहणच म्हणता येईल. एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी वापरलं जाणारं साधन हे सध्या सगळयांच्या आयुष्याचा अविभाज्य घटक बनले आहे. अगदी लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळेच या मोबाइलच्या अधीन झालेले आपल्याला दिसतात. लहान मुलं जेवताना व्हिडिओज, गोष्टी बघण्यासाठी, कुमारवयीन, किशोरवयीन मुलं वेगवेगळे गेम्स खेळण्यासाठी, वेगवेगळया सोशल नेटवर्किंग साइट्सवर फोटोज अपलोड करण्यासाठी, चॅटिंग करण्यासाठी सररास मोबाइल वापरताना आपल्याला दिसतात.

फेसबुक, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट, व्हॉट्स ॲप, यू ट्यूब या सोशल नेटवर्किंग साइट्स, तसंच पब्जी, क्लॅश ऑफ क्लॅन यासारखे गेम्स सध्या कुमारवयीन मुलं वापरताना आपल्याला दिसतात.

## भुजबळांमुळे कुंभमेळा बैठकीची उत्सुकता

**त्र्यंबकेश्वर ।** छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला असल्याने आगामी कुभमेळा बैठकीची उत्सुकता वाढली आहे.

भुजबळ यांना पालकमंत्री पदाची संधी मिळणार का अशी चर्चा एक जूनला होणाऱ्या कुंभमेळ्याच्या बैठकीचे निमित्ताने सुरू झाले आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे. शासन स्तरावर मे महिन्यात बैठक होणार होती ती आता जूनमध्ये होत आहे. भुजबळ यांचे मंत्रीपद जाहीर झाल्यानंतर अवघ्या आठवडाभरातच कुंभमेळ्याची नाशिकला बैठक होत आहे.

# शेतीकामांचा खोळंबा

**नांदगाव तालुका वार्तापत्र**
**संजय मोरे**





नांदगाव तालुक्यातील गेल्या काही आठवड्यापासून वादळी पावसाच्या तडाख्यात सर्वा मोठे नुकसान शेती क्षेत्राचे झालेले आहे. ऐन खरीप हंगामाची मशागत सुरू होताना पावसाने एप्रिल, मे महिन्यात जोरदा हजेरी लावून शेतमशागतीच्या काळात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची ही कामे काही दिवस खोळंबणार आहेत.

शेतीत अगोदर मजूर मिळत नाही. त्यात बाहेरगावाहून मजुर आणून काम करावे लागते. यात सर्वांक पदरमोड या पावसामुळे शेतकऱ्यांच्या कांदा, भुईमूग,आंबा, डाळिंब आणि इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून झाडे उमळून पडले असून घरांची देखील पडझड झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अवकाळी पावसाने रिमझिम तर मेघगर्जनेसह वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी लागत असल्याने या थैमान घातलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या नाकीनऊ आणले आहे. मशागतीच्या कामाला वेळ मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांपुढील चिंता आहे.अवकाळी पावसाने गहू ,भुईमूग ,कांदासह आदी पिकाची हानी मोठ्या प्रमाणात झाली आहे. खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने या अवकाळी पावसामुळे पेरण्याचे गणित कोलमडून पडते की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. नांदगाव तालुक्यातील शेतीपिकांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे.अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला. यात प्रामुख्याने कांदा, गहू, टोमॅटो, भाजीपाला फळबागासह शेतीचे नुकसान झाले आहे. अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला असून, अस्मानी संकटाचा सामना कसा करायचा, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.तालुक्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना शासनाने मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.अवकाळी पावसामुळे उष्णता कमी झाली असली तरी शेतकऱ्यांच्या कांदा, भुईमूग,आंबा, डाळिंब आणि इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नांदगाव तालुक्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असून तालुक्यातील २६ गांवे आणि १२७ वाड्यावस्ती ६२ फेऱ्याद्वारे ३०टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे.